पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री, जि. औरंगाबाद.

# वार्षिक अहवाल २०१६-२०१७

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

## वार्षिक अहवाल २०१६-१७

महाविद्यालयाची सुरुवात दि. १६ जून २०१६ रोजी झाली. त्याच दिवशी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन शैक्षणिक वर्ष २०१६-१७ च्या सर्व नियोजनावर चर्चा केली. त्यानुसार सर्व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे ठरले.

### नॅक समितीची भेट

महाविद्यालयाचे नॅक या कार्यालयाकडून मुल्यांकन व मुल्यमापन करुन घेण्यासाठी महाविद्यालयात दि. ०७ ते १० ऑगस्ट २०१६ या दरम्यान नॅक समितीने भेट दिली. समितीमध्ये एकूण ३ सदस्यांचा सामावेश होता. त्यामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. ए. के. मित्तल (कुलगुरू बाबु बनारसी दास विद्यापीठ, लखनौ, उत्तरप्रदेश), सदस्य म्हणून डॉ. डी. आर. वजनी (प्राचार्य, एम. पी. शाह, कॉमर्स कॉलेज, सुरेंद्रनगर, गुजरात) तर समितीच्या समन्वयक डॉ. एम. विमला (प्राध्यापक, हिंदी विभाग, बंगलोर विद्यापीठ, बंगलोर) ह्या होत्या. वरील समितीने दिनांक ७ ते १० ऑगस्ट २०१६ या तीन दिवसांमध्ये महाविद्यालयातील सर्व विभाग, ग्रंथालय, कार्यालय, क्रीडा विभाग अशा विविध विभागांना भेटी देऊन आपला अहवाल नॅक च्या कार्यालयाकडे सादर केला. त्याची एक प्रत प्राचार्य यांच्याकडे दिली. दिनांक १६ सप्टेंबर २०१६ रोजी महाविद्यालयास **बी ग्रेड** प्राप्त झाल्याचा संदेश नॅकच्या कार्यालयाकडून प्राप्त झाला. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष मा. ना. श्री हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात बैठक झाली. संबंधित बैठकीमध्ये अहवालामध्ये सूचविण्यात आलेल्या सूचनांचा विचार करण्यात आला व पुढील पाच वर्षामध्ये दिलेल्या सूचनांची पूर्तता करून पुर्नमुल्यांकनामध्ये महाविद्यालयास ए ग्रेड प्राप्त होईल अशा दृष्टीतून तयारी करावी असे बैठकीत ठरले. संबंधित बैठकीमध्ये संस्थेचे सचिव मा. डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी आपल्या मौलिक सूचना केल्या.

### विद्यार्थी परिषद विभाग

१) **गुणवंत विद्यार्थी सत्कार :** दि. २७ ऑगस्ट २०१६ रोजी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील १२ वी व महाविद्यालयीन पदवी स्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे दै. सकाळचे संपादक मा. श्री संजय वरकड तर अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे हे होते. या कार्यक्रमामध्ये एकूण ४९ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना विवेकानंदाचे पुस्तक व पुष्प भेट देण्यात आले.

२) **प्रतिनिधी व सचिव निवड प्रक्रिया :** दिनांक १ सप्टेंबर २०१६ रोजी प्राचार्य व विद्यार्थी परिषदेचे प्राध्यापक यांच्या बैठकीमध्ये नवीन विद्यापीठ कायदा येईपर्यंत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी परिषदेचे प्रतिनिधी व सचिव म्हणून कृष्णा विष्णु साबळे या विद्यार्थ्याची सर्वानूमते बिनविरोध निवड करण्यात आली.

३) **सावता भूषण पुरस्कार निवड प्रक्रिया :** महाविद्यालयाच्या वतीने बी. ए. व बी. कॉम. मधून तृतीय वर्षाच्या एका विद्यार्थ्यांला पुरस्कारासाठी लागू असलेल्या नियम व अटींच्या अधीन राहून हा पुरस्कार दिला जातो. या संबंधी दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येणारी सूचना लावण्यात आली व विद्यार्थ्यांना १८ तारखेपर्यंतची मुदत देण्यात आली. दिनांक १८ जानेवारी २०१७ रोजी प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन स्तरावर सावताभूषण पुरस्कारासाठी तयार केलेल्या समितीची बैठक बोलावून त्या बैठकीमध्ये आलेल्या अर्जावर चर्चा झाली. परंतु या पुरस्कारासाठी बी. कॉम. तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री कृष्णा विष्णु साबळे याचा एकमेव पात्र अर्ज आल्यामुळे या विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा सावता भूषण पुरस्कार देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

४) **वार्षिक स्नेहसंमेलन**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक १९ ते २१ जानेवारी २०१७ दरम्यान आयोजित करण्यात आले. दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी ५ वाजता मा. डॉ. जयंत शेवतेकर (नाट्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांच्या उपस्थित व संस्थेचे सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजी सकाळी

विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयामध्ये क्रीडा स्पर्धा, काव्यवाचन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्न मंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

दिनांक २१ जानेवारी २०१७ रोजी समारोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुहास मोराळे (संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद) मा. डॉ. प्रमोद पाटील (सदस्य स्थानिक व्यवस्थापन समिती) व प्रा. डॉ. भुमरे तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे उपस्थित होते. या समारोप समारंभात स्नेहसमेंलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील प्रथम, द्वितीय विजेत्या विद्यार्थ्यांना प्रोत्सहनपर प्रमाणपत्र व पुस्तक भेट देण्यात आले.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील सावताभूषण पुरस्काराचे वितरण या समारोप समारंभात करण्यात आले. या पुरस्काराचे मानपत्र वाचन प्रा. डॉ. सुरेश मुंढे यांनी केले. याप्रसंगी सावताभूषण पुरस्कार हा श्री कृष्णा विष्णु साबळे या बी. कॉम. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याला मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. अशा प्रकारे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

### राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत विविध कार्यक्रम

**१) आव्हान - चान्सलर्स ब्रिगेड - आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि. ०५ जून ते १४ जून २०१६ दरम्यान पार पडलेल्या आव्हान - चान्सलर्स ब्रिगेड - आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समुहात महाविद्यालयाच्या कृष्णा साबळे व सुनिल डिडोरे या दोन स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले व हे आव्हान शिबिर यशस्वीपणे पूर्ण केले.

**२) आंतरराष्ट्रीय योग दिन**

दि. २१ जून २०१६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सकाळी ६.०० वा. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर एक दिवसीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे उपस्थित होते. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालयाचे व परिसरातील विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक वर्ग व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर व प्रा. राजेंद्र आंबवणे यांनी परिश्रम घेतले.

**३) कृषि दिन - वनमहोत्सव निमित्त वृक्षारोपन**

दि. १ जुलै २०१६ रोजी कृषि दिन वनमहोत्सवाच्या निमित्ताने शासन आदेशानूसार महाविद्यालयाच्या परिसरात फुलंब्री पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री महाजन साहेब व पोलीस उपनिरीक्षक कु. मनीषा लटपटे यांच्या हस्ते ५० वृक्षांची लागवड करून हा कृषि दिन व वनमहोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे उपस्थित होते.

**४) विभागीय कार्यक्रमाधिकारी कार्यशाळा**

दि. ३ ऑगस्ट २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पार पडलेल्या विभागीय कार्यक्रमाधिकारी कार्यशाळेस महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी सहभागी नोंदविला.

**५) स्वच्छता - श्रमदान**

दि. १५ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी श्रमदान करुन परिसर स्वच्छ केला.

**६) स्वच्छता - शपथ**

दि. १६ ऑगस्ट २०१६ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सामाजिकशास्त्राचे अधिष्ठाता डॉ. विलास खंदारे व प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या उपस्थितीत शासनाच्या आदेशानूसार स्वयंसेवक, इतर विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग यांच्याकडून "मी घाण करणार नाही व करू देणार नाही, मी परिसर स्वच्छ राखण्याचा प्रयत्न करले" अशा आशयाची शपथ घेण्यात आली.

**७) सदभावना दिवस - शपथ**

दि. २० ऑगस्ट २०१६ रोजी सदभावना दिनाच्या निमित्ताने रासेयो च्या स्वयंसेवकांकडून सामजिक ऐक्याची शपथ घेण्यात आली.

## ८) अवयव दान - जनजागृती रॅली

दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानूसार अवयव दान संदर्भात जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने फुलंब्री शहरातून रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते.

## ९) अवयव दान व्याख्यान

दि. ६ सप्टेंबर २०१६ रोजी फुलंब्री ग्रामीण रुग्णाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. नीती मस्के यांनी अवयव दान, समाज, तथ्थ्ये, सामाजिक बांधिलकी व आपले कर्तव्य या विषयावर व्याख्यान दिले.

## १०) प्राध्यापकांचे अवयव दान निर्णय

दि. ६ सप्टेंबर २०१६ रोजी अवयव दान संदर्भात देशभर सुरू असलेल्या जनजागृती मोहिमेत आपले योगदान देऊन सामाजिक बांधिलकी जोपासून महाविद्यालयाच्या रा.सो.यो. विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात व समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंजुषा नळगीरकर या तीन प्राध्यापकांनी आपले अवयव दान करण्यासंदर्भात असणारा संमती अर्ज भरून दिला.

## ११) SRD/NRD संचलन पूर्व निवड चाचणी सहभाग

दि. ०९ सप्टेंबर २०१६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात झालेल्या SRD/NRD संचलन पूर्व निवड चाचणीत महाविद्यालयाच्या रासेयो च्या पाच स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

## १२) सार्वजनिक गणेशोत्सव तपासणी

दि. ८ ते १२ सप्टेंबर २०१६ दरम्यान रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांची नियुक्ती फुलंब्रीच्या शिक्षण अधिकाऱ्यांकडून तालुक्यातील गणेश मंडळाच्या देखाव्यांची सामाजिक अंगाणे तपासणी करून मुल्यांकन करण्यासाठीच्या समितीवर करण्यात आली होती. यावेळी त्यांनी सदरील जबाबदारी यशस्वीपणे पार पाडून सदरचा अहवाल शासनास सादर करण्यात आला.

## १३) रा.से.यो. दिन २४ सप्टेंबर २०१६

महाविद्यालयात दि. २४ सप्टेंबर २०१६ रोजी रा.से.यो. दिन साजरा करण्यात आला. यावेळी गट समन्वयक डॉ. पी. एम. कल्याणकर, कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर व प्रा. राजेंद्र अंबावणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## १४) कार्यशाळा - पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

दि. २३ सप्टेंबर २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "ध्यास हागणदारी मुक्त औरंगाबाद" या विषयावर एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा पार पाडली. या कार्यशाळेस महाविद्यालयाच्या वतीने ५ स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र आंबवणे हे उपस्थित होते.

## १५) एड्स दिन

दि. १ डिसेंबर २०१६ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामीण रुग्णालय, फुलंब्री येथील कर्मचाऱ्यांनी महाविद्यलयात एक पोस्टर प्रदर्शन लावले होते. यावेळी त्यांनी उपस्थित शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना एड्स या आजाराची माहिती, कारणे, उपाय, काळजी, लक्षणे, निरोधचा वापर या सर्व विषयावर माहिती देण्यात आली.

## १६) कॅशलेस व्यवहार - व्याख्यान

दि. १५ डिसेंबर २०१६ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कॅशलेस व्यवहार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी CEDTI INSTITUTE औरंगाबाद येथील कर्मचाऱ्यांनी उपस्थित स्वयंसेवकांना व प्राध्यापक वृन्दांना इंटरनेट बँकिंग तसेच विविध मोबाईल बँकिंग ॲपस् संदर्भात माहिती दिली.

## १७) तालुका स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धा

दि. २९ डिसेंबर २०१६ रोजी राजर्षी शाहु महाविद्यालय, पाथ्री येथे पार पडलेल्या तालुका स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला, या स्पर्धेत स्वयंसेवक सुनील डीडोरे याने वरिष्ठ गटातून द्वितीय क्रमांक पटकाविला, तर कनिष्ट महाविद्यालयाच्या कु. अश्विनी बारवाल या विद्यार्थिनीने कनिष्ठ गटातून तृतीय क्रमांक पटकाविला.

**१८) जिल्हा स्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धा**

दि. ११ जानेवारी २०१७ रोजी विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाच्या स्वयंसेवक सुनील डीडोरे (तालुका स्तरीय-द्वितीय विजेता), याने वरिष्ठ गटातून सहभाग नोंदविला.

**१९) श्रमदान - ३० जानेवारी २०१७ गांधी पुण्यतिथी**

दि. ३० जानेवारी २०१७ रोजी गांधी पुण्यतिथी निमित्त स्वयंसेवकाच्या श्रमदानातून महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

**२०) संत गाडगे महाराज जयंती २३ फेब्रुवारी २०१७**

दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी संत गाडगे महाराज जयंती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे संत गाडगे महाराज यांच्या स्मृतीचे पूजन करुन त्यांना अभिवादन करुन त्यांची जयंती साजरी करण्यात आली.

## आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग

महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये समाजस्तर, महाविद्यालय स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन केले. दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले. तसेच विक्री प्रतिनिधी व कम्युनिकेटिव्ह हे दोन स्वंयनिर्वाह अभ्यासक्रम चालविले.

**१) स्वातंत्र्यदिनी व्याख्यानाचे आयोजन**

दि. १५ ऑगस्ट २०१६ रोजी फुलंब्री गावातील लहुजी साळवे संस्कार केंद्रावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. कैलास इंगळे (मराठी विभाग प्रमुख, राजर्षी शाहु महाविद्यालय, पाथ्री) यांचे "भारतीय स्वातंत्र्य व वर्तमान समाजव्यवस्था" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

सर्वांच्या सामुहिक प्रयत्न व बलिदानातून भारताला स्वातंत्र्य मिळाले. राज्यघटनेने सर्वांना एकच मत देऊन राजकीय हक्काबाबत समता प्रस्तापित केली. असे असले तरी आजही राजकीय सत्तेत घराणेशाही निर्माण झालेली आहे. म्हणजे आपणास मतदानापूरते स्वातंत्र्य मिळाले आहे. माणुस संवेदनशिलता हरवत चालला आहे असे मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. प्रत्येक व्यक्तीने आपण समाजासाठी काय देतो याचा विचार करावा. सुशिक्षित वर्गाने इतरांना जागृत करावे असे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कृष्णा साबळे, प्रास्ताविक डॉ. कल्याणकर पी. एम., प्रार्थना कु. प्रतिक्षा गायकवाड, कु. पुजा गरसोळे या विद्यार्थीनी तर आभार प्रा. राजेंद्र अंबावणे यांनी मानले.

**२) आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस**

अ) घोषवाक्य व निबंध स्पर्धा

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून दिनांक ६ सप्टेंबर २०१६ रोजी घोषवाक्य व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. निबंध स्पर्धेसाठी "साक्षरतेचे मानवी जीवनातील महत्त्व" हा विषय ठेवण्यात आला होता. घोषवाक्य स्पर्धेत स्पर्धकांनी लिहलेल्या निवडक घोषवाक्यांचा उपयोग रॅलीमध्ये हातात धरल्या जाणाऱ्या फलकावर लिहण्यासाठी केला.

ब) आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी रॅली

दिनांक ८ सप्टेंबर २०१६ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून फुलंब्री गावातून रॅली काढण्यात आली. संबंधित रॅली महाविद्यालय, जळगाव रोड ते खुलताबाद टी पाईंट, पोलिस स्थानक, बाजार गल्ली, कासार गल्ली इ. ठिकाणाहून पुढे तेली गल्ली, बाजार गल्ली ते महाविद्यालय अशी काढण्यात आली. रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांच्या हातात साक्षरता, राष्ट्रीय ऐक्य, पर्यावरण संवर्धन यांचे महत्त्व सांगणारे फलक देण्यात आले होते. रॅलीत सहभागी झालेल्यांनी ठिकठिकाणी घोषणा दिल्या. रॅलीच्या सुरक्षेसाठी फुलंब्री पोलिस स्थानकाचे पोलिस बंदोबस्त दिला होता.

संबंधित रॅलीत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांबरोबर, श्री संत गुरुकुल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले होते. या रॅलीच्या यशस्वितेसाठी प्रा. नितीन माळेगावकर, प्रा. राजेंद्र आंबवणे, डॉ. गणेश कुलकर्णी यांनी सहकार्य केले.

**३) आरोग्य जागृती व तपासणी शिबिर**

दि. २६ सप्टेंबर २०१६ रोजी फुलंब्री गावातील बाजर पट्टी जवळ असलेल्या झोपडपट्टीतील लोकांसाठी "आरोग्य जागृती व तपासणी शिबिराचे" आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या आयोजनात वैद्यकीय सल्ला व तपासणी, औषधी वाटप यासाठी फुलंब्री ग्रामीण रुग्णालयाचे सहकार्य मिळाले.

शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ. विजय काथार म्हणाले की, उत्तम आरोग्यासाठी चांगला व पुरेसा आहार, पुरेशी झोप, व्यक्तीगत व सामुहिक स्वच्छता व व्यायामाची गरज आहे. यावेळी डॉ. काथार यांच्या बरोबरच डॉ. फरीन सय्यद, डॉ. सुरेश ताठे, डॉ. सिंकदर शेख या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली.

समुपदेशक श्री संजय चौबे व प्रयोगशाळा तंत्रज्ञ सौ. संध्या घोळवे यांनी रक्त तपासणी केली. तर औषध विभागातील श्री संकेत महाजन, सौ. लिलाबाई वानी, सौ. मंगला गवळी, सौ. सारिका घोडके इत्यादींनी औषधी वाटून सहकार्य केले. यावेळी ६५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. प्रास्ताविक डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी केले. संबंधित शिबिराच्या आयोजनासाठी प्रा. नितीन माळेगावकर, प्रा. राजेंद्र आंबवणे, डॉ. संदीप जगताप व स्वंय सेवकांनी सहकार्य केले.

**४) विद्यापीठ नामविस्तार दिन**

दि. १४ जानेवारी २०१७ रोजी विद्यापीठ नामविस्तार दिनाचे औचित्य साधून फुलंब्री गावातील लहुजी साळवे संस्कार केंद्रावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. गंगाधर मोरे यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार" या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्याने विद्यापीठाची उंची वाढली आहे.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री कृष्णा साबळे या स्वंयसेवकाने केले. तर आभार प्रा. नितीन माळेगावकर यांनी मानले. त्यानंतर बाजार पट्टीतील महिलांना प्रा. डॉ. मंजुषा नळगिरकर व प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी तिळगुळ वाटप केले.

**५) प्रजासत्ताक दिनी व्याख्यानाचे आयोजन**

दिनांक २६ जानेवरी २०१७ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात "भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्ये" या विषयावर डॉ. आश्रुबा गवळी (राज्यशास्त्र विभाग, छत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद) यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी ते म्हणाले की, भारतीय राज्यघटना ही विस्तृत व लिखित आहे. भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. राज्यघटनेत जनतेचे मुलभूत अधिकार दिलेले आहेत. संघराज्यशासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. भारतीय राज्यघटना अंशत: ताठर व लवचिक आहे. राज्यघटनेने केंद्र सरकार प्रबळ केले आहे. राज्यघटनेने न्यायालयास स्वातंत्र्य दिलेले आहे. भारतीय राज्यघटना ही प्रगतीशील राज्यघटना आहे इत्यादी वैशिष्ट्यावर त्यांनी भर दिला.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. पाहुण्यांचा परिचय व स्वागत प्रा. नितीन माळेगावकर यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी केले तर आभार प्रा. राजेंद्र आंबवणे यांनी मानले.

**६) विद्यापीठस्तरीय कार्यशाळा**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आजीवन शिक्षण आणि विस्तार आयोजित केलेल्या कार्यशाळेत डॉ. कल्याणकर पी. एम. दि. ३० जुलै २०१६ रोजी कार्यक्रमाधिकारी व कु. शितल जाधव, सुनिल गंगावणे दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी विद्यार्थी विस्तार उपक्रम कार्यशाळेत सहभागी झाले.

**७) स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम**

या विभागाच्या माध्यमातून दोन स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम चालविले जातात. एक विक्री प्रतिनिधी तर दुसरा Certificate course in Communicative English यातील पहिल्या अभ्यासक्रमात १० तर दुसऱ्या ११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यातील विक्री प्रतिनिधी या अभ्यासक्रमाचे डॉ. महेश थोरात व प्रा. नितीन माळेगावकर समन्वयक आहेत तर Certificate course in Communicative या अभ्यासक्रमाचे डॉ. अश्विन रांजणीकर व प्रा. राजेंद्र अंबावणे हे समन्वयक आहेत.

## परीक्षा विभाग

या विभागाकडून विद्यापीठ व महाविद्यालयातील अंतर्गत परीक्षांचे आयोजन केले जाते. विद्यापीठाच्या ऑक्टो. व नोव्हें. व मार्च/एप्रिल अशा दोन परीक्षा घेतल्या जातात. तसेच विद्यार्थ्यांना वेळोवेळी परीक्षा संदर्भात येणाऱ्या सूचना दिल्या जातात. तसेच परीक्षेचे शाखानिहाय निकाल तयार करण्याचे काम याच विभागाकडून केले जाते.

१) निकाल — मार्च/एप्रिल २०१६

| Dept. | | Admitted | Appear | Passed | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| B.A | I | १२६ | ८५ | ०९ | १०.५८ |
| | II | ८६ | ७४ | १३ | १७.५६ |
| | III | ७२ | ६८ | १५ | २२.०५ |
| B.Com | I | १०५ | ८१ | ०४ | ०४.९४ |
| | II | ५९ | ५३ | २१ | ३९.६२ |
| | III | ३८ | ३६ | ०९ | २५.०० |

**२) उद्‌बोधन :**

परीक्षेसंदर्भातील उद्‌बोधन दरवर्षीप्रमाणे गुणवंतांच्या सत्कार कार्यक्रमात दि. २७/०८/२०१६ रोजी करण्यात आले.

**३) कॉपीमुक्त परीक्षा केंद्र पुरस्कार प्रस्ताव :**

आदर्श परीक्षा केंद्रासाठी दि. २० जुलै २०१६ रोजी महाविद्यालयाच्या वतीने प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यात आला होतो.

## प्रसिद्धी विभाग

महाविद्यालयातील समाजपूरक, ज्ञानपूरक तसेच शैक्षणिक विषयांना अनुसरुन आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोहंचावी, दृष्ठा समाज बनावा त्याचबरोबर समाजात चालू असलेल्या घडामोडींचे ज्ञान जनमानसाला व्हावे समाज चांगल्या दिशेला घेवून जाणे हा प्रांजळ प्रयत्न प्रसिद्धी विभागाचा आहे.

**बातमी प्रसिद्ध झालेले वर्तमान पत्र**

| अ.क्र. | वर्तमान पत्र | प्रकाशित संख्या | अ.क्र. | वर्तमान पत्र | प्रकाशित संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | दैनिक सकाळ | १६ | ०८ | दैनिक पुढारी | ०३ |
| २ | दैनिक महाराष्ट्र टाईम्स | १२ | ०९ | दैनिक पुण्यनगरी | ०३ |
| ३ | दैनिक गावकरी | ०८ | १० | दैनिक आनंद नगरी | ०२ |
| ४ | दैनिक तरुण भारत | ०७ | ११ | दैनिक भास्कर | ०२ |
| ५ | दैनिक दिव्य मराठी | ०५ | १२ | दैनिक सामना | ०० |
| ६ | दैनिक देशोन्नती | ०४ | १३ | दैनिक सुर्योदय | ०० |
| ७ | दैनिक लोकमत | ०३ | १४ | दैनिक टिकास्त्र | ०० |

## सांस्कृतिक विभाग

**१) राजर्षी शाहू महाराज जयंती**

दिनांक २६ जून २०१६ रोजी राजर्षी शाहू महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला.

**२) गुरुपौर्णिमा**

दिनांक १९ जुलै २०१६ रोजी 'गुरुपौर्णिमेचे' आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. राजेंद्र अंबावणे यांनी गुरू शिष्य परंपरा व पूर्वाश्रमींच्या गुरूंचे स्थान या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी डॉ. अश्विन रांजणीकर उपस्थित होते.

**३) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, संत सावता माळी पुण्यतिथी व लोकमान्य टिळक पुण्यतिथी**

दिनांक ०१ ऑगस्ट २०१६ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, संत सावता माळी पुण्यतिथी व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. विशाल शर्मा (चेतना महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांची उपस्थिती लाभली.

**४) कै. रावसाहेब दांडगे पुण्यतिथी**

दिनांक १३ ऑगस्ट २०१६ रोजी कै. रावसाहेब दांडगे पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी संस्थापक अध्यक्ष कै. रावसाहेब दांडगे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

५) विद्यापीठ वर्धापन दिन

दिनांक २३ ऑगस्ट २०१६ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त प्रा. डॉ. प्रभाकर जगताप यांनी 'उच्चशिक्षण आणि सद्यस्थिती' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

६) भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

दिनांक १५ ऑक्टोबर २०१६ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त डॉ. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. तसेच यावेळी काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आल्या. त्यासोबतच विद्यार्थी व शिक्षकांसाठी ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.

७) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दिनांक ०३ जानेवारी २०१७ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन ही जयंती साजरी करण्यात आली.

८) स्वामी विवेकानंद व मातोश्री जिजाऊ जयंती

दिनांक १२ जानेवारी २०१७ रोजी स्वामी विवेकानंद व मातोश्री जिजाऊ यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी स्वामी विवेकानंद व मातोश्री जिजाऊ यांच्या कार्याचा विचार मांडला.

९) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दिनांक २३ जानेवारी २०१७ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करुन जयंती साजरी करण्यात आली.

१०) हुतात्मा दिन

दिनांक ३० जानेवारी २०१७ रोजी महाराष्ट्र शासन व उच्च शिक्षण मंत्रालय यांच्या आदेशानूसार हुतात्मा दिन दोन मिनिटे स्तब्द उभे राहून साजरा करण्यात आला.

११) केंद्रीय युवक महोत्सव

दिनांक १९ ते २२ सप्टेंबर २०१६ दरम्यान श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर येथे केंद्रीय युवक महोत्सव पार पडला. या युवक महोत्सवात १४ कलाप्रकारात एकूण १२ विद्यार्थी कलावंतांनी सहभाग नोंदविला.

१२) वार्षिक स्नेहसंमेलन

दिनांक २० जानेवारी २०१७ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक स्नेह संमेलनात ०९ विद्यार्थी व ०९ विद्यार्थिनींचा सहभाग होता. यात त्यांनी जागरण, कोळी, गणेश स्तवन, देशभक्तीपर गीतांचे उत्कृष्ठ असे सादरीकरण केले.

१३) विशेष कार्य

श्री संत सावता माळी सांस्कृतिक विभाग आणि सरस्वती फाऊंडेशन, फुलंब्री यांच्या वतीने फुलंब्री पंचायत समिती अंतर्गत तालुक्यातील विविध गावांमध्ये 'मतदार जागृती अभियान' विषयावरील पथनाट्यांचे सादरीकरण केले.

## स्पर्धा परीक्षा विभाग

१) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी जुलै महिण्यात नाव नोंदणिची सुविधा उपलब्ध करण्यात आली. स्पर्धा परीक्षा विभागात नाव नोंदविलेल्या विद्यार्थ्यांना ३० रु. शुल्क आकारुन ओळखपत्र देण्यात आले. तसेच आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी ग्रंथालयातून स्पर्धा परीक्षेची दोन पुस्तके अभ्यासासाठी देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षात ३९ विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा विभागात प्रवेश घेतला.

२) दि. ३१ ऑगस्ट २०१६ रोजी श्री बापूसाहेब महाजन (पोलीस निरीक्षक, फुलंब्री पोलीस स्टेशन) यांनी पोलीस व आर्मी भरती तर दि. १० सप्टेंबर २०१६ रोजी श्री भरत दुतोंडे (तलाठी, सजा पाल) यांनी तलाठी परीक्षेची तयारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

३) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिने मार्गदर्शन करण्यासाठी २० तासिका घेण्यात आल्या.

# आचार्यकुल प्रबोधिनी

**१) शोध निबंध वाचन**

**अ)** प्रा. राजेंद्र अंबावण विषय : Communication Types : Verbal and Non-verbal, दि. २८/१२/२०१६, **आ)** डॉ. महेश थोरात, विषय : पंडित दीनदयाळजी चे कृषि विषयक विचार दि. २८/१२/२०१६ **इ)** डॉ. अश्विन रांजणीकर विषय : Nature Man and Human Life in the Poetry of Robert frost दि. ०५/०१/२०१७
**ई)** डॉ. सुरेश मुंढे विषय : सूफी साधना का आधार स्तंभ : गुरू दि. ०५/०१/२०१७, **उ)** डॉ. राजश्री पवार विषय : उत्तम कांबळे यांचे वाट तुडवताना : एक आस्वाद व आकलन दि. २२/०२/२०१७, **ऊ)** डॉ. रामकिशन लोमटे विषय : महाविद्यालयीन युवकांचा राजकीय सहभाग : फुलंब्री परिसरातील अभ्यास दि. २२/०२/२०१७, **ए)** डॉ. संदीप जगताप विषय : Effect Yoga and Meditation on Health Related Phy. Fit of Boxing plans. दि. २२/०२/२०१७

**२) सहविचार सभा - १५ ते १७ जुलै २०१६**

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या अंतर्गत आचार्यकुल प्रबोधिनी द्वारा आयोजित तीन दिवसीय निवासी शिबीर स्वामी विवेकानंद विद्यालय, चित्तेपिंपळगाव ता. जि. औरंगाबाद येथे संपन्न झाले.

दि. १५/०७/२०१६ रोजी डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी संस्थेची सैद्धांतिक भूमिका मांडली. दि. १६/०७/२०१६ रोजी श्री एम. के. देशमुख यांनी रचनावादी अध्ययन या विषयावर विचार मांडले. अध्यक्षपदी श्री रामभाऊ गावंडे होते. श्री दादासाहेब नवपुते यांनी विद्यार्थी समस्या व उपाय यावर विचार मांडले. अध्यक्षपदी श्री गुरुनाळकर बी. पी. होते.

दि. १७/०७/२०१६ रोजी श्री सुर्यकांत सराफ यांनी 'अध्ययनातील कलोपासना' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षपदी श्री पांदे आर. बी. होते. दुपारच्या सत्रात श्री बाबा भांड यांनी 'माझ्या जडणघडणीत शिक्षकाचे योगदान' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षपदी श्रीमती खोतकर एस. बी. होत्या.

समारोप सत्रामध्ये डॉ. रामदास अंबुलगेकर यांनी 'आजची शिक्षण पद्धती : सुधारणा' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष श्री देवजीभाई पटेल व सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे उपस्थित होते.

**३) सहल**

दि. ०३/१२/२०१६ रोजी 'स्नेहालय पुर्नवसन संकुल एम.आय.डी.सी. अहमदनगर' येथे महाविद्यालयाच्या आचार्यकुल प्रबोधिनी अंतर्गत अभ्यास सहल काढण्यात आली. येथे चाईल्ड लाईन्स, स्नेहागार, स्नेहांकुर, हिंमतग्राम, बालभवन, रोजगार निर्मिती केंद्र याची सर्वांनी पाहणी केली. झोपडपट्टीतील व वेश्याच्या आणि एड्सगस्त बालकांसाठी समर्पित संस्थेच्या माध्यमातून होत असलेल्या कार्याची सर्वांनी माहिती व कार्यपद्धती समजावून घेतली. डॉ. गिरीष कुलकर्णी यांच्या प्रेरणेने सुरू असलेले हे कार्य आम्हा सर्वांना प्रेरणादायी व दिशादर्शक ठरले. या सोबतच येताना सर्वांनी 'प्लॅनोटेरियम' संग्राहलयाला भेट देऊन अवकाशासंबंधी फिल्मद्वारे प्रगती पाहण्यात आली.

**४) शिक्षक मदतीचा हात**

महाविद्यालयात प्राध्यापकांच्या वतीने प्रतिमाह १०० रुपये याप्रमाणे जमा होणाऱ्या रक्कमेमधून गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याची पद्धती सुरू आहे. त्या अंतर्गत मार्च महिन्यापर्यंत जमा रक्कमेतून विद्यार्थ्यांना परीक्षा फी व प्रवास भाड्याकरिता मदत करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| जमा रक्कम | २८०० | जून, जुलै २०१६ |
| | १५००० | ऑगस्ट, सप्टेंबर २०१६ |
| | २००० | ऑक्टोबर, डिसेंबर २०१६ |
| **एकूण जमा रक्कम** | **१९८००** | |
| खर्च रक्कम | १५२० | ०२ विद्यार्थ्यांना ॲडमिशनसाठी मदत |
| | २२५० | ०५ विद्यार्थ्यांना परीक्षा फी साठी मदत |
| | १६०१० | ०६ विद्यार्थ्यांना प्रवास भाडे साठी मदत |
| **एकूण खर्च रक्कम** | **१९७८०** | |

या योजनेतंर्गत वर्ष २०१६-१७ मध्ये १३ विद्यार्थ्यांना १९७८० रुपये वाटप करण्यात आले. तर प्राध्यापकांनी जमा केलेली रक्कम १९८०० असे २० रुपये एकूण जमा रक्कम आहे.

## लहुजी साळवे संस्कार केंद्र

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयाच्या वतीने सुरू असलेल्या फुलंब्रीच्या बाजार पट्टीतील लहुजी साळवे संस्कार केंद्रावर वर्षभर नियमित तासिका घेण्यात आलेल्या आहेत. यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी नेमून दिलेल्या दिवसी प्रत्यक्ष हजर राहून संस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय वर्षभरात पूढील कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

१) **तीळगुळ वाटप :** संस्कार केंद्रावर दि. १४ जानेवारी २०१७ रोजी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या वतीने तीळगुळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

२) **कपडे वाटप :** डॉ. अश्विन रांजणीकर यांनी नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून संस्कार केंद्रातील पाच कुमारिकांना ड्रेसचे वाटप केले.

३) दि. १०/०८/२०१६ रोजी **NAAC** कमेटीने संस्कार केंद्राला भेट देऊन कार्याचा गौरव केला.

## कै. आ. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना
## कमवा व शिका

१) **फुलझाडाची लागवड :** महाविद्यालय परिसरातील बागेमध्ये व इमारतीच्या आतील बाजुस गलांडाची फुल झाडांची लागवड करण्यात आली. त्यासाठी लागणारी रोपे ही आपल्या रोपवाटीकेत रोपे तयार करुन तीची लागवड विविध ठिकाणी करण्यात आली. त्यामुळे परिसरात पिवळी, केशरी रंगाच्या फुलांनी परिसर बहरुन गेला आहे. या फुलांचा वापर प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयातील कार्यक्रमासाठी लागणारी फुले, हार, पुष्पगुच्छ तयार करण्याची वापरली जातात.

२) **गांडुळ निर्मिती प्रकल्प :** या प्रकल्पामध्ये महाविद्यालय परिसरातील निघणारे गवत, काडी कचरा, पाने यांचे गांडुळ खत तयार केले जाते. व हे तयार झालेले खत परिसरातील फुलांच्या झाडांना वापर केला जातो. त्यामुळे त्यांची नैसर्गिक वाढ मोठ्या प्रमाणात होत आहे.

३) **रोप वाटिका :** या प्रकल्पांतर्गत या वर्षी गलाडांची रोपे, तुळशीची रोपे, मोगरांची रोप लागवड करण्यात आली व तीच रोपे महाविद्यालय परिसरात लागवड करण्यात आली आहे.

४) **पालेभाज्या प्रकल्प :** या वर्षात कांदा, लसुन, मुळा, कोथिंबीर, कडीपत्ता या झाडांची ८X७ च्या आकाचे वाफे तयार करुन यामध्ये लागवड करण्यात आली आहे. व ह्या पालेभाज्या शाळेमध्ये खिचडी बनविण्याकरिता वापरली जाते.

५) **परिसर स्वच्छता, निगा व देखभाल :** महाविद्यालयातील सर्व परिसरात तसेच इमारतीमधील झाडांची निगा राखने, जसे आळे करणे, झाडांची लागवड करणे, तन काढणे, पालापाचोळा गोळा करुन जैविक- अजैविक कचरा प्रकल्पात टाकला जातो. तसेच कमावा शिका योजनेच्या विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाच्या नियोजनात मदत घेतली जाते.

६) **शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील वृक्ष लागवड** : १) तुळशीचे झाडे-३०, गलडांची झाडे-२००, शोभेचे झाडे-०६.

७) **कमवा व शिका योजनेचे वेळापत्रक व संख्या :** दररोज दुपारी ३ ते ५ (सार्वजनिक सुट्टी वगळता) या योजनेमध्ये विद्यार्थी संख्या : १० मुले (०६ मुले व ०४ मुली) ओपन-०४, ओबीसी-०२, एस.सी.-०१, एन.टी-०३.

८) **आर्थिक अनुदान :** विद्यापीठ ५०% = ८३००
महाविद्यालय ५०% = ८३०० एकत्रित मानधन प्रति महिना रु. ४१५ दिले जाते.

## प्रवेश समिती

१) **माहिती पुस्तिका छपाई :** प्रवेश समितीकडून ३० एप्रिल २०१६ रोजी सर्व विभागांचे वार्षिक नियोजन तयार करुन त्यांचे एकत्रिकरण करण्यात आले व ते मे महिण्यामध्ये छपाईसाठी देण्यात आले. १ जून २०१६ रोजी माहिती पुस्तकांची छपाई करण्यात आली. एकूण ५०० माहिती माहितीपुस्तिका छापण्यात आल्या.

२) **कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी :** १६ जून २०१६ रोजी प्राचार्यांच्या अध्यक्षेतखाली बैठक घेऊन त्यानुसार जून महिन्यातील शेवटचा पूर्ण आठवडा परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांना प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी समुपदेशनासाठी भेटी दिल्या. प्रत्यक्ष भेटीतून विद्यार्थ्यांना महाविद्यालचे वैशिष्ट्ये सांगण्यात आले. विद्यार्थ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक, वर्ग इत्यादी माहिती संकलित करुन त्यांना महाविद्यालयाचे माहिती पत्रक देण्यात आले व त्या त्या गावातील महत्त्वाच्या ठिकाणी बॅनर लावण्यात आले.

३) **प्रवेशसाठी समित्यांची स्थापना :** १६ जून रोजी महाविद्यालयाची सुरुवात झाली. त्यानुसार प्रवेशासंबंधीच्या जबाबदारीचे वाटप करण्यात आले. वार्षिक नियोजन, समित्या स्थापुन फोटोसह, विविध प्रवर्गासाठी व वर्गासाठी असणाऱ्या शुल्क याची प्रत्येकी एक-एक प्रत महाविद्यालयातील सूचनाफलकावर लावण्यात आली.

४) **वेळापत्रक :** दि. १ जुलै २०१६ रोजी महाविद्यालयाचे वेळापत्रक बनविण्यात आले. यात विषय, वर्गखोली, प्राध्यापकांचे नाव यानुसार वेळापत्रकाची एक-एक प्रत सर्वांना देण्यात आली व त्यानुसार त्या त्या विभागाचे विभाग प्रमुख व सहाय्यकांच्या वेळापत्रकाची एक-एक प्रत समितीकडे जमा करुण घेण्यात आली.

५) **विद्यार्थी प्रवेशित संख्या :** प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शाखा व वर्गनिहाय संख्या (२०१६-१७)

| वर्ग | बी. ए. | | | बी. कॉम. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| प्रथम वर्ष | ५७ | ४९ | १०६ | ३८ | ३० | ६८ |
| द्वितीय वर्ष | ३० | ३८ | ६८ | ३६ | २८ | ६४ |
| तृतीय वर्ष | २९ | ३८ | ६७ | २८ | १७ | ४५ |
| **एकूण** | **११६** | **१२५** | **२४१** | **१०२** | **७५** | **१७७** |

## संशोधन समिती

संशोधन समितीच्या वतीने वर्षभरात तीन अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी प्रा. डॉ. पद्माकर सहारे (सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) यांचे "संशोधनातील एस.पी.एस.एस. चा उपयोग" या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

दि. २९ सप्टेंबर २०१६ रोजी प्रा. डॉ. बी. आर. धापसे (हिंदी विभाग प्रमुख, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर) यांचे "भाषा अनुसंधान सिद्धांत एवंम् व्यवहार" या विषयावर व्याख्यान झाले. सदरील व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

दि. १२ जानेवारी २०१७ रोजी प्रा. डॉ. दिनकर टकले (अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर जि. जालना) यांचे "प्राध्यापकांचा संशोधनातील सहभाग" या विषयावर व्याख्यान झाले. सदरील व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

वर्षभरात संशोधन समितीच्या दोन बैठका घेण्यात आल्या. (दि. १ सप्टेंबर २०१६ व दि. ९ जानेवारी २०१७) सदरील बैठकीत घेण्यात आलेल्या ठरावाप्रमाणे सर्व विभाग प्रमुखांना क्षेत्र सर्वेक्षण व सामंजस्य करार करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या. तसेच नॅक ने संशोधनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेल्या सूचनाही सर्वांपर्यंत पोहचविण्यात आल्या.

## माजी विद्यार्थी व पालक समन्वय समिती

१) **माजी विद्यार्थी बैठक - दिनांक ९ जुलै २०१६**

दिनांक ९ जुलै २०१६ रोजी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या उपस्थितीत माजी विद्यार्थ्यांची बैठक झाली. या बैठकीस माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री कचरु गरसोळे, श्री किशोर नागरे, श्री अनिल जाधव, मोबीन पाशा, सुरेश राठोड, पंकज साळवे, विष्णु वहाटुळे, बाबासाहेब लहाने, समिर पठाण, राजेंद्र नागरे इत्यादी उपस्थित होते. दि. ८ ऑगस्ट २०१६ रोजी नॅक समिती महाविद्यालयाचे तपासणी करण्यात येणार असल्याने यावेळी नॅकच्या पार्श्वभूमिवर दिनांक ८ ऑगस्टला अधिकाधिक माजी विद्यार्थी हजर करण्यासाठी, माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे अशी विनंती उपस्थित माजी विद्यार्थ्यांना केली. यावेळी डॉ. कल्याणकर पांडुरंग, डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. अश्विन रांजणीकर यांनी नॅक समितीला माजी विद्यार्थी संघाने कसे सामोरे जावे या संदर्भात मार्गदर्शन केले तर माजी विद्यार्थी संघाने आपली नोंदणी करावी असे मत प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी मांडले. या बैठकीत माजी विद्यार्थी संघाची मुदत २०१६-१७ पर्यंत वाढवण्यासाठी ठराव संमत केला.

२) **शिक्षक पालक संघ बैठक - दिनांक २१ जुलै २०१६**

दिनांक २१ जुलै २०१६ रोजी शिक्षक पालक संघाची बैठक बोलवण्यात आली. यासाठी शिवाजी कोतकर, सुभाष जाधव, कारभारी नागलोद यांनी अनुक्रमे बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचा पालक प्रतिनिधी म्हणून निवड केली, तर पुंडलिक जाधव, अण्णा ढंगारे, रामदास वैष्णव यांची बी. कॉम प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचा पालक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. या बैठकीत शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा. राजेंद्र अंबावणे, डॉ. सुरेश मुंढे, डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. महेश थोरात इत्यादी हजर होते. बैठकीच्या

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. बैठकीचे समन्वय डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नॅक समिती दिनांक ८ ऑगस्ट २०१६ महाविद्यालयास भेट देणार असल्याने प्रत्येक वर्गाच्या पालक प्रतिनिधीनी व शिक्षक प्रतिनिधीनी अधिकाधिक पालकांना या बैठकीसाठी घेऊन यावे असे अवाहन सर्वांना करण्यात आले.

**३) माजी विद्यार्थी बैठक - दि. २६ जानेवारी २०१७**

दि. २६ जानेवारी २०१७ रोजी सकाळी ११ वाजता माजी विद्यार्थ्यांची बैठक घेण्यात आली. ही बैठक प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री कचरु गरसोळे व्यासपिठावर होते. डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी प्रास्तविकातून माजी विद्यार्थी संघाने आपली नोंदणी करावी तरच त्यास कायदेशीर स्वरुप येईल. माजी विद्यार्थी संघाने स्वत:च्या बैठका स्वत: आयोजित कराव्यात, त्यासाठी महाविद्यालयाचे प्रतिनिधी हजर राहतील. संघ स्वयंप्रेरणेने कार्यरत व्हावा. माजी विद्यार्थी संघ केवळ बैठकांपुरता मर्यादित न राहता त्याने कार्यप्रवण व्हावे. विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यलयात व समाजपातळीवर करावे असे मत त्यांनी मांडले. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी संघ कार्यप्रवण होण्यासाठी सूचना करण्यात सांगितले यावेळी श्री पंकज साळवे, श्री सुहास दुतोंडे, श्री गोरक्ष मंडळ यांनी आपली मते मांडली तसेच प्रा. डॉ. महेश थोरात, प्रा. नितीन माळेगावकर यांनीही सूचना केल्या. त्यानंतर श्री कचरु गरसोळे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना माजी विद्यार्थी संघ नोंदणी संदर्भात आम्ही लवकरच कार्यकरु तसेच यानंतर माजी विद्यार्थी संघ विविध उपक्रमांचे आयोजन करले त्यासाठी मी स्वत: १०००/- रुपये निधी जमा करतो असे मत त्यांनी मांडले. बैठकीचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. माजी विद्यार्थी नोंदणी संदर्भात आवश्यक असलेले कार्यालयीन सहकार्य आपण करण्यास तयार असल्याचे मत त्यांनी मांडले.

## शैक्षणिक सहल समिती

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री ची शैक्षणिक सहल दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी काढण्यात आली होती. या सहलीत जळगाव येथील अहिंसा तिर्थ, जैनहिल जळगाव येथील विविध कृषि साहाय्यक व कृषि प्रक्रिया उद्योगांना भेट देण्याचे ठरले होते. त्यानंतर मनुदेवी फॉरेस्ट प्रकल्पास भेट देण्याचे नियोजित करण्यात आले. सहलीत ३१ विद्यार्थी सहभागी झाले होते. ज्यात १७ विद्यार्थीनी व १५ विद्यार्थी हजर होते. तसे सोबत ४ प्राध्यापक होते ज्यामध्ये डॉ. कल्याणकर पी. एम., डॉ. महेश थोरात, डॉ. सुरेश मुंढे व डॉ. मंजुषा नळगीरकर यांचा सहभाग होता.

**१) परिश्रम दालनास भेट**

जैन उद्योग समुहाच्या विविध उत्पादनाची माहिती देण्यासाठी तसेच या उद्योग समुहाच्या विकास व विस्तारांची माहिती देणाऱ्या परिश्रम या दालनास प्रथमत: भेट देण्यात आली. एका रॉकेलच्या व्यवसायापासून सुरूवात करुन बहुराष्ट्रीय कंपनी पर्यंत उद्योगाचा झालेला विकास त्यातून स्पष्ट झाला. सूक्ष्म सिंचनाच्या विविध पद्धतीची माहिती व्हावी यासाठी या इमारतीसमोर प्रारुप स्वरूपात मांडलेल्या तुषार, ठिंबक, रेनगन इत्यादी आधुनिक सिंचन साहितयाची माहिती देण्यात आली.

**२) टिश्युकल्चर लॅब**

प्रथमत: चांगल्या प्रजातीच्या केळीच्या वाणाचा विस्तार करण्यासाठी ही लॅब सुरु करण्यात आली होती. कमी कालावधीत येणारे व दोन वेळेस घड देणारे केळीचे वाण जैन उद्योग समुहाने या चांगल्या वाणाच्या केळीच्या (मातृवृक्ष) पेशींना प्रयोगशाळेत एअरकंडिशन मध्ये काचेच्या बॉटल मध्ये वाढवले जाते. पेशी पासून तयार झालेल्या छोट्या रोपांना एकमेकांपासून वेगळेकरुन नंतर त्यांना टप्पा-टप्याने हरिगृहात, शेडनेट मध्ये वाढवून बाहेरच्या वातावरणात आणले जाते. ही सर्व प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. या प्रयोगशाळेत केळी बरोबरच डाळींब व स्ट्रॉबेरीचे सुद्धा वाण विकसित करण्यात आले आहे.

**३) जैन नविनीकरण ऊर्जा पार्क**

जैनहिल परिसरात ४८ एकरावर स्थापन केलेल्या ऐनर्जीपार्क प्रकल्पास भेट देण्यात आली. त्यामध्ये ४०,००० सौरपॅनलच्या आधारे १०५ मॅगवॅट सौर ऊर्जा निर्माण केली जाते याची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. तसेच फुउवेस्ट पासून तयार केल्या जाणाऱ्या बायोगॅस प्रकल्पास भेट दिली.

**४) कांदा निर्जलीकरण प्रकल्प**

जैनहिल परिसरात जैन फार्म फ्रेश प्रकल्पात स्थापन करण्यात आलेल्या कांदा निर्जलीकरण प्रकल्पास भेट देण्यात आली. यात कांदा धुणे नंतर कापणे नंतर निर्जलीकरण करणे, त्यानंतर पॅकिंग करणे इत्यादी प्रक्रिया समजावून घेतल्या.

**५) फळ प्रक्रिया प्रकल्प**

ब) नादुरूस्त नाल्यातील गाळ व कचरा साफ केला

सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ओपन ड्रेनेज लाई आहे. परंतु सततच्या वापरामुळे त्यात केरकचरा जाऊन ब्लॉक झाल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरुन वाहत असे. नादुरूस्त नाला दुरूस्त करुन त्यातील केरकचरा स्वयंसेवकांनी साफ केला.

क) स्वच्छता गृहासाठी शौचखड्डे

गावात ज्याची स्वत:चे शौचालय नव्हते अशा कुटुबांना शौचालय बाधता यावे यासाठी स्वंयसेवकांमार्फत श्रमदान म्हणून शौचखड्डे खोदण्यात आले. याआधी ग्रामसेवकांच्या माध्यमातून शौचालय नसलेल्या कुटुबियांची यादी घेण्यात आली व गावकऱ्यांच्या मागदर्शनाने व सहकार्याने एकुण १६ शोषखड्डे खोदण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थी आपल्या गावी आलेले आहेत हे लक्षात येतात काही ग्रामस्थांनी शौचालयाचे बांधकाम जलदगतीने करण्यास प्रारंभ केलेला दिसून आला.

**७) बौद्धिक सत्र**

विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांचा विकास व्हावा व विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्त्व बहरावे या कल्पनेतून विद्यार्थीभिमुख बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात दररोज दुपारी ३ ते ४.३० या वेळेत बौद्धिक सत्र ठेवण्यात आले होते. यामध्ये दि. १३ फेब्रुवारी २०१७ रोजी बौद्धिक सत्रात वक्तृत्व कला व संभाषण कौशल्य या विषयावर डॉ. अश्विन रांजणीकर व डॉ. सुरेश मुंढे यांनी या विषयावर मार्गदर्शन केले. व विद्यार्थ्यांना स्वंयस्फुर्तीने वक्तृत्व करण्यासाठी प्रोत्साहित केले.

दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी बौद्धिक सत्राचा विषय कविता वाचन व लेखन कौशल्य होता. या विषयावर मार्गदर्शक व परिक्षक म्हणून डॉ. संजीवकुमार पांचाळ व डॉ. महेश थोरात उपस्थित होते. उपस्थित

मान्यवर पाहुण्यांनी वाचन कौशल्य व लेखन याबाबत स्वयंसेवकांना उद्‌बोधित केले व आपल्या गावरान शैलीत कवितेचे वाचन करुन कविता वाचन कौशल्य विद्यार्थ्यांत रूजवण्याचा प्रयत्न केला.

दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ रोजी उत्सर्फुत कथाकथन या बौद्धि सत्राचे आयोजन केले होते. यात विद्यार्थ्यांनी कथा कशी सांगावी याबाबत मार्गदर्शन केले. दि. १६ फेब्रुवारी २०१७ रोजी नाट्यकला या विषयावर बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री अरुण विटेकर यांनी विद्यार्थ्यांना अभिनय कला यावरील काही प्रात्यक्षिके करून दाखविली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात यांची उपस्थिती होती.

दिनांक १७ फेब्रुवारी २०१७ रोजी क्रीडा विषयक मार्गदर्शन या व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्यात महाविद्यालयातील क्रीडा विभागातील प्रा. डॉ. संदीप जगताप यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**८) व्याख्यान सत्र**

शिबिरात सायंकाळी ७ ते ९ यावेळेते व्याख्यान सत्र ठेवण्यात आले होते. यामाध्यमातून ग्रामस्थांना व स्वयंसेवकांना ग्रामीण जीवनाशी निगडीत विविध विषयावर समाजातील तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शपर विचार एकण्याची संधी निर्माण करण्यात आली.

अ) संत साहित्य व ग्रामविकास

दि. १२ फेब्रुवारी २०१७ रोजी संत साहित्य व ग्रामविकास या विषयावर प्रा. विजय गवळी यांनी आपले विचार मांडले. संत साहित्यातुन ग्रामविकासाचा संदेश कसा दिला आहे याचे विवेचन त्यांनी अनेक संतांचे दाखले देऊन केले. त्यात संत तुकोबा, संत गाडगे महाराज, संत सावता इ. संतांचे ग्रामविकास विषयक विचार मांडले. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंजुषा नळगीरकर उपस्थित होत्या.

ब) कायदा व सुव्यवस्था

दि. १३ फेब्रुवारी २०१७ रोजी कायदा व सुव्यवस्था या विषयावर फुलंब्री पोलीस स्टेशनचे श्री राऊत साहेब यांनी कायदा व सुव्यवस्था या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले.

क) काव्यनिर्मिती कौशल्य

दि. १४ फेब्रुवारी २०१७ रोजी डॉ. समाधान इंगळे यांनी काव्य निर्मिती कौशल्य या विषयावर उपस्थितांना उद्‌बोधित केले. तसेच काही स्वयंनिर्मित कवितेचे सादरीकरन करून ग्रामस्थांचे मनोरंजन केले. त्यांच्या कवितेतुन त्यांनी ग्रामीण विचारधार व संस्कृती यावर उद्‌बोधन केले.

ड) कृषि आधारित पुरक व्यवसाय

दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी कृषि आधारित पुरक व्यवसाय या विषयावर प्रा. भगवान साखळे यांनी ग्रामस्थांना व स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कृषि व्यावसायाशी पुरक असलेल्या अन्य व्यवसायांची सांगड घालुन मुख्य व्यवसाय कसा बलशाली बनवता येईल व पुरक व्यवसायाचे महत्त्व लोकांना पटवुन दिले. शेती व्यवसाय निगडीत असलेले पुरक व्यवसाय त्यात दुग्ध व्यवसाय, कुकुट पालन, मधुमख्खी पालन इ. पुरक व्यवसायाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयातील हिंदी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. येडले यांनी कृषि सहाय्यक योजना या विषयावर मार्गदर्शन केले.

इ) शिवाजी महाराजांचे जीवन व कार्य

दि. १६ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळच्या व्याख्यान सत्रात शिवाजी महाराज यांचे जीवन व कार्य या विषयावर महाविद्यालयातील श्री बाबासाहेब दाभाडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील धाडसी प्रसंग सांगून शिवाजी महाराजांचे विचार लोकांना कसे प्रेरणादायी आहे हे स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. विजय पांडे यांनी भूषविले व अध्यक्षीय भाषणात त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनशैली व वक्तृत्वावर प्रकाश टाकला.

ई) कृषि विषयक समस्या

दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळच्या व्याख्यान सत्रात कृषि विभाग फुलंब्री येथील श्री खंडागळे साहेब यांनी कृषि विषयक समस्या व त्यावर उपाय योजना या विषयावर प्रकाश टाकून ग्रामस्थांच्या कृषि विषयक समस्यावर ग्रामस्थांशी संवाद साधला. याप्रसंगी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी अध्यक्षीय समारोप केला.

**९) सांस्कृतिक कार्यक्रम**

गावकऱ्यांचे मनोरंजनातून उद्‌बोधन व्हावे या दृष्टिने शिबिरात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ९.३० ते १०.३० या वेळेत करयात आले. यात पहिल्या दिवशी गावकऱ्यांचा व शिबिरार्थींचा संवाद घडवून आनला. तसेच त्यानंतरच्या दिवशी सरस्वती फाऊंडेशन तर्फे अस्वच्छतेमुळे व बाहेर शौचलयाला गेल्यामुळे गाव कशा प्रकारे विविध साथीच्या रोगाला बळी पडले या विषयावर नाटीका सादर करण्यात आली. तसेच त्यानंतर जि. प. प्र. दरेगाव दरी येथील लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. तसेच महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी प्रबोधनपर नाटीका सादर केली. त्यात वाईट संगत केल्यामुळे शेतकरी कशा प्रकारे आपल्या संसाराची धुलधान करून घेतो व शेवटी व्यसनाच्या अहारी जाऊन आत्महत्या करतो. यातुन जसे लक्षात येते की चांगल्या मित्रांच्या संगतीत राहिलो तर जीवन सुख होते.

**१०) शिबिर समारोप**

दिनांक १९ फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत शिबिराचा समारोप झाला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. भिमराव भोसले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना ही व्यापक स्वरूपाची योजना असून युवकांकडून देशसेवेच प्रत्यक्षपणे काम करणे व राष्ट्रउभारणीत युवकांचा सहभाग वाढवण्यात योगदान देणारी आहे. आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेचा व्यापक उद्देश स्वयंसेवकांना समजावून सांगितला. आजचे युवक हे भावी देशाचे नागरीक आहेत आणि त्यांच्यात चांगल्या गुणांची जोपासना करणे म्हणजे राष्ट्रनिर्मितीला हातभार लावणे होय. यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर होते. व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

## स्व. जमनलाल बजाज उपक्रम - व्याख्यानमाला (२ ऑक्टोबर २०१६)

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंबी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग व मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संयुक्त विद्यमाने स्व. जमनलाल बजाज उपक्रमांतर्गत दिनांक २ ऑक्टोंबर २०१६ रोजी महात्मा गांधी व पंडित दीनदयाळ यांची विकास निती या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रार्थनेने झाली. त्यानंतर प्रतिमा पुजन करण्यात आले. यावेळी परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले, कार्यवाह खजिनदार डॉ. राजेंद्र भांडवलकर, अर्थसंवादाचे संपादक डॉ. अविनाश निकम, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री बाळासाहेब सराटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव ठोंबरे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद राबवित असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

महात्मा गांधी व पंडित दीनदयाळयांची विकास निती या विषयावर बोलतांना प्रमुख वक्ते श्री बाळासाहेब सराटे म्हणाले की, महात्मा गांधी व पंडित दीनदयाळ या दोघांचे विचार भारतीय विचार धारेवर आधारलेले होते. विकास का माणूस केंद्री असावा. माणासाच्याविकास करताना त्याच्या शरीर, मन, बुद्धी व आत्माचा विकास झाला पाहिजे. यंत्र, स्पर्धा, बाजार व उपभोग याचा अतिरेक माणसाच्या अस्तीत्वाला घातक असतो. जसे यंत्राचा अतीरेकी वापर माणसाला बेकार करतो. म्हणून यासर्वाच्या वापरावर नियंत्रण पाहिजे. असे दोन्ही विचारवंताचे मत होते.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना परिषदेचे माजी अध्यक्ष व पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे म्हणाले की, महात्मा गांधीव पंडित दीनदयाळ यांचे विचार प्रत्यक्ष आचरणात उतरवणे गरजेचे आहे. महात्मा गांधीच्या नावावर राजकीय सत्ता उपभोगणारे अनेक लोक आहेत. परंतु विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारे अत्यल्प आहेत. महाविद्यालयास मराठी अर्थशास्त्र परिषदेनेसदरील उपक्रम दिल्याबद्दल परिषदेचे आभारही त्यांनी मानले.

या कार्यक्रमास माहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, डॉ. ए. बी. देवगिरीकर (निवृत्त प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) प्रा. डॉ. अशोक पवार, डॉ. गणेश गांवडे, डॉ. ए. डी. एरंडे, प्रा. ए. बी. पवार, डॉ. विजय सूर्वे, परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. डी. जोशी इत्यादी अर्थशास्त्र अभ्यासकांची उपस्थिती होती.

तसेच श्री अनिल सवंत्सर, श्री ज्ञानेश्वर थोरे, श्री आप्पासाहेब चव्हाण, ग्रामस्थांमध्ये श्री नरेंद्र देशमुख, श्री जनार्धन तुपे, श्री मगरे, श्री संजय त्रिभूवन, श्री संत सावता संकुलातील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संयोजक म्हणून महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी काम केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. अश्विन रांजणीकर यांनी, प्रार्थना डॉ. मंजुषा नळगीरकर, सुविचार डॉ. रामकिशन लोमटे यांनी तर आभार अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. विजय पांडे, डॉ राजश्री पवार, डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. दत्तात्रय येडले, डॉ, सुरेश मुंढे, डॉ. संजिवकुमार पांचाळ, डॉ. महेश थोरात, प्रा. नितीन माळेगावकर, श्री दयाराम कांबळे, श्री बाबासाहेब दाभाडे, श्री प्रेम चव्हाण व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचा शेवट महात्मा गांधी यांच्या वैष्णव जन या गिताने झाला.

## A day workshop on Office Management, Finance & Accounts for Non-Teaching staff of colleges (3 March 2017)

1) **Introduction:**
ShriSantSavta Mali GraminMahavidyalayPhulmabri has organized a day workshop on Office Management, Finance & Accounts for the IQAC Co-ordinators and Non- Teaching staff especially who are looking after Accounts, Establishment, Examinations& Scholarship in various colleges on 3rd March 2017 in the college. The workshop was sponsored by University Grants Commission &Dr.BabasahebAmbedkarMarathwada University Aurangabad. From all over the Marathwada 83 participants have participated in the workshop. 8 resource persons have delivered lectures in the workshop with practical and PPP.

2) **Inauguration Ceremony:**
The workshop is inaugurated by Principal Dr.ShivrajBirajdar, Dr.ShivajiThore, Principal, Deogiri College, Aurangabad has delivered key-note address, Hon. HaribhauBagde, President, PanditDeendayalUpadhayaShikshanSanstha chaired the inauguration ceremony, Dr.SarjeraoThombre, Secretary, PanditDeendayalUpadhayaShikshanSanstha was the chief gust for the ceremony. Principal and Convener of the workshop Principal, Dr.S.R.Takle presented the objectives behind organising the workshop in his introductory speech.

3) **Plenary Session:**
The plenary session is conducted by Smt. Darshna Gandhi, Registrar, MuktanandMahavidyalya, Gangapur and Dr.ShivajiSangle, Principal, Indraraj College, Sillod chaired the session.

4) **Plenary Session:**
After the lunch the plenary session is conducted by Dr.D.M. Netke, Controller of Examinations, Dr.BabasahebAmbedkarMarathwada University, Aurangabad. Mr.JitendraSonawane, Senior Auditor, Dept. of Higher Education has also delivered a lecture in the session.

5) **Valedictory Function:**
Dr.Hameed Khan, Professor, Maulana Azad Chair (UGC), Dr.B.A.M.U.A'bad&Dr.MilindUbale Principal, VasantraoNaik College Aurangabad were the chief guest of the function &Dr.SarjeraoThombre was the president of the function.
Dr.VinodBhalerao, Sawarkar College Beed, Mr.from S.B. Science College Aurangabad and Mr.DayaramKamble, ShriSantSavta Mali GraminMahavidyalayaPhulambri expresses their views about the workshop. Dr. Suresh Mundhe&Dr. Mahesh Thorat carried out the proceedings of the workshop. Dr.AshwinRanjanikar&Mr.PremChavan registered vote of thanks.

## Entrepreneurship Development Workshop (20 December 2016)

Pandit Deendayal Upadhyay Education Society's Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya, Department of Commerce and University Grant Commission sponsored One

Day Entrepreneurship Development Workshop organized on 20th December 2016. The Inaugural function was conducted on 10:30 am, First Session at 12:30 pm, Second Session at 2:30 pm and Valedictory session at 3:45pm.

Entrepreneurship Development workshop was inaugurated at 10:30 am by Inaugurator Dr. Rohini Kachole *(Entrepreneur of Ayurvedic Hair and Skin)* Prof.Syed Azharuddin, Dr. Nandkumar Rathi, Dr. Sarjerao Thombre, Dr. Subhash Takle, Dr. Mahesh Thorat, Mr. Nitin Malegaonkar

Introductory speech for Workshop was given by the Head of Department Dr. Mahesh Thorat. Dr. Thorat commented the role of Department of Commerce in College and the objectives of Entrepreneurship Development Workshop.

Dr. Kachole Madam delivered speech on opportunities available to women's in entrepreneurship. Dr. Kachole madam describes the role of women's in the corporate world. Dr. Kachole madam also guided to students on, How to identify entrepreneurial opportunity in the market, Product Selection, creating demand for product and marketing product. Dr. Kachole Madam explained all this concepts with help of her own experience to students.

The Chief Guest of this inaugural function Dr. Syed Azharuddin instructed to students on the opportunities in entrepreneurship and Economic Policy. Dr. Syed sir started speech with quote as "In doctors conference they said 'We Save Lives', in Engineer conference, they said 'We build Nation' but in the conference of Entrepreneur, they said 'We Make Nation Great'. This statement clearly stated the role of Entrepreneur in the development of the Nation. Dr. Syed Sir guide students the Qualities of Entrepreneur and identifying entrepreneurial qualities in the students. To encourage students, Dr. Syed Sir introduced some examples of successful entrepreneur. He gave the information on the financial assistance available for new entrepreneur.

Dr. Sarjerao Thombre Sir, a chairperson, in his concluding remark of function, they explained the opportunities available in agriculture based industry. Immediately, First Session was started in which the Chief Guest Dr. Nandkumar Rathi guided to Students.

Dr. Rathi Sir appreciates the Prayer of the College. He like a sentence of Prayer "Udhyogachi kas dharuya." This means we should be an Entrepreneur. And motivated to students to become an entrepreneur. Dr. Rathi Sir guided to Students the important of Innovative Ideas in Business. To clarify it, he gave some examples of businesses where innovative ideas properly used. Dr. Rathi sir also guided regarding financial assistance available for women entrepreneur and subsidy or concession available from Government and banks for them and opportunities available to women's in service industry.

The vote of thanks for Inaugural Function as well as First Session was given by Mr. Nitin Malegaonkar.

The Second session, the chief guest Mrs. Savita Munde do provide guideline on opportunity available in Agro Based Product Industry. Being a Women Entrepreneur, Madam encourages girls to enter in Entrepreneurship. Mrs. Munde Madam shared her own experience as an Entrepreneur. Mrs. Munde Madam explained 4 P's of Marketing and importance of it for the industry.

Mrs. Munde Madam shared the view related to business are depends on the agriculture. Madam provided the information in respect to plant and machinery required for the business, how to get information of plant and machinery required and sources of funds available and subsidy and concession available for Agro Based Industry. Chairperson Dr. Pandurang Kalyankar guided to students on the Agro Based industry and suitable place of this industry. He has also guided on the opportunities of Agro Based Industry near Phulambri.

In Valedictory session Shri Gajanan Palsodkar Sir guided students on the Role and Objectives of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED) in Entrepreneurship Development. He explained the Vision of MCED i.e. "To create & develop spirit of Entrepreneurship globally" and objectives of MCED, such as creating entrepreneurial and managerial capabilities in the individual by satisfying customer,

emerging technologies and be financial strong and globally excellent organization. Palsodkar Sir explained the business Opportunity, Trainings available for Entrepreneurship Development, Different Courses offered by MCED for Self-employment and different seminar and conference taken for Entrepreneurial Personality Development. He also provided the information of MCED Bulletin "Udyojak". The vote of thanks for Valedictory Function was given by Mr. Nitin Malegaonkar

In this workshop total 76 students participated. The students of different colleges were also participated such as students of Ramdas Athawale Arts, Commerce and Science College, Chowka, New Kohinoor College, Chowka and Rajeshri Shahu College, Pathri and Department of Commerce, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad. The anchoring of this workshop was done by the student of B. Com. Third Year Mr. Krushna Sable. We believe that this workshop will definitely beneficial to all participated students and students shall be Self Employed. In the upcoming year, we like to see these students as a successful Entrepreneur of our country.

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा (२४ व २५ जानेवारी २०१७)

महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण विभागाने दिनांक २४ व २५ जानेवारी २०१७ या कालावधीत दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यात पुढील विविध सत्रांचे आयोजन केले गेले.

**२४ जानेवारी २०१७**

**सत्र पहिले : व्यक्तीमत्व विकास**

या कार्यशाळेचे उद्घाटन दि. २४ जानेवारी २०१७ रोजी डॉ. संजय मुन (संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग) यांनी केले. या प्रसंगी ते म्हणाले की, या विभागाच्या माध्यमातून मनुष्यबळ विकासाची प्रक्रिया चालवली जाते. देशाचा विकास म्हणजे केवळ प्रदेशाचा विस्तार नसून त्यात वास्तव करणाऱ्या मनुष्यांचा विकाय होय असे मत त्यांनी मांडले. यावेळी बीजभाषण श्री सचीन तायडे (कार्पोरेट ट्रेनर) यांनी "व्यक्तीमत्व विकास" या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की, दुसऱ्याचे अनुकरन थांबवून प्रत्येकाने आपल्या व्यक्तीगत क्षमतांचा विकास केला पाहिजे. व्यक्तीमत्त्व विकासाच्या प्रक्रियेत विचार प्रक्रियेच्या विकासावर भर देणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी मांडले.

या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी विभाग राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. शाईन केसर व लक्ष्मीकांत ढेपले या विद्यार्थ्यांनी केले. सविचार श्री सचिन जाधव याने मांडला तर आभार डॉ. महेश थोरात यांनी मानले.

**सत्र दुसरे : उद्योजकता विकास**

या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात बोलतांना श्री गजानन पळसोदकर (प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजगता विकास केंद्र, औरंगाबाद) यांनी उद्योगजगासाठी आवश्यक असलेल्या अनेक गुणांचे विश्लेषण केले. त्यामध्ये अडिअडचणींना सामोरे जाणारा, अपयशाने ना उमेद न होणारा, प्रचंड आत्मविश्वास, आव्हाने स्वीकारणारा, आशावादी व अभिप्रायाची इच्छा बाळगणारा या गुणांची आवश्यकता व्यक्त केली.

**सत्र तिसरे : बायोडाटा**

या विषयावर बोलतांना डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी बायोडामध्ये कोणत्याबाबी अंतर्भूत असल्या पाहिजे याचे स्पष्टीकरण दिले. तर या सत्राच अध्यक्षीय समारोप प्रा. विजय पांडे यांनी केला.

**२४ व २५ जानेवारी २०१७**

**सत्र चौथे : कौशल्य विकास**

कार्यशाळेच्या दिसऱ्या दिवशी "कौशल्य विकास" या विषयावर शेख एम. एस. , श्री बोरसे आर. के. (निर्देशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फुलंब्री) यांनी मार्गदर्शन केले. कौशल्य विकासाच्या संदर्भात शासन राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. रामकिशन लोमटे यांनी केला.

**सत्र पाचवे - एम.पी.एस.सी. परीक्षेची ओळख व तयारी**

या विषयावर बोलताना श्री कपील हांडे (समन्वयक, दी युनिक ॲकेडमी, औरंगाबाद) यांनी एम.पी.एस.सी परीक्षेचे स्वरुप स्पष्ट केले. या परीक्षेची तयारी करीत असतांना स्पर्धकांनी वाचनापूर्वी परीक्षेचे

स्वरुप समाजावून घ्यावे. अभ्यासक्रम माहिती करावा, गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करावे. त्यानंतर वाचनास सुरूवात करावी व शेवटी सराव करावा. अन्य सर्व गोष्टीमधून वेळ काढून वाचन करा व आई-वडिलांच्या अपेक्षांच्या जाणिवेचे ओझे आपल्या डोक्यावर ठेवा असे मत ज्यांनी मांडले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. मंजुषा नळगिरकर यांनी केला.

**समारोप सत्र - मुलाखत तंत्र**

मुलाखत तंत्र या विषयावर डॉ. महेश थोरात व डॉ. सुरेश मुंढे यांनी मार्गदर्शन केले. मुलाखत देतांना देणाऱ्याचा प्रश्न अगोदर समजावू घ्यावा व नंतरच उत्तर द्यावे. वेशभूषा व्यवस्थित करावी. मुलाखत देणारा कोणत्या पदासाठी व क्षेत्रासाठी मुलाखत देत आहे यावरसुद्धा मुलाखतीची तयारी अवलंबून असते. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केला.

## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा (२४ डिसेंबर २०१६)

**उद्घाटन सत्रः-**

स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमास उद्घाटन म्हणून निवृत्त आय .ए. एस. अधिकारी श्री कृष्णा भोगे (संचालक, भोगे करिअर डेव्हलपमेंट अकॅडमी औरंगाबाद ) हे लागले होते. तर अध्यक्ष म्हणून डॉ. सर्जेराव ठोंबरे (सचिव , पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था (वरुड)औरंगाबाद) हे लाभले होते श्री कृष्णा भोगे यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी श्री कृष्णा भोगे यांनी असे मत व्यक्त केले की, स्पर्धा परिक्षेत यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे. एकदा ध्येय निश्चित झाले की, ज्या पदावर आपल्याला जायचे आहे. त्याचा अभ्यासक्रम पाठ करावा अभ्यासक्रमाचे सर्व ज्ञान मिळविण्यासाठी जिद्द, चिकाटी, परिश्रम आभ्यास व प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी अपयश आल्यामुळे खचून न जाता पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील आय. ए. एस. अधिकारी बनू शकतात असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी चालू घडामोडीचे पुस्तक, विविध विषयावरील दर्जेदार नोट्सचे पुस्तक तयार करावे. ज्याचा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी लाभ होईल असे ही मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा व सेमिनार घेण्यात यावेत अशी ही सूचना श्री कूष्णा भोगे यांनी या प्रसंगी केली. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी असे मत व्यक्त केले की, स्पर्धा परिक्षा हे एक असे क्षेत्र आहे. ज्या माध्यमातून व्यक्ती चांगल्या अधिकार पदावर काम करु शकते व देशाच्या व समाजाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देऊ शकते. सदरील कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मांडले. सुत्रसंचालन व आभार कृष्णा साबळे व शितल जाधव यांनी केले.

**सत्र पहिले**

पहिल्या सत्रास प्रमुख वक्ते म्हणून श्री मधूर पोळळे (समन्वयक, युनिक अकॅडमी औरंगाबाद ) हे लाभले होते त्यांनी यु. पी. एस. सी. परिक्षेची तयारी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर हे लाभले होते. श्री मधूर पोफळे यांनी आपल्या मार्गदर्शनात असे मत व्यक्त केले की, विद्यार्थ्यांनी यु.पी. एस. सी. ची तयारी केली. तर ते एम. पी. एस. परिक्षा सहज पास होऊ शकतात. म्हणजेच आपल ध्येय मोठ असेल तरच त्याच्या खालची ध्येय आपण सहज प्राप्त करु शकतो ग्रामीण भागातील मुलांना यु.पी.एस.सी. परिक्षा देण्याविषयी भिती व संकोच वाटतो कारण ती परिक्षा हिंदी/इंग्रजी भाषेतून असल्यामुळे आणि निगेटिव्ह मार्किंग सिस्टममुळे अशी भिती विद्यार्थ्यांनी मनातून काढून टाकावी, इग्रजी जमत नसेल तर हिंदीची तयारी करावी सतत हिंदी सहित्य वाचनातून व बोलण्यातून आपण हिंदी सुधारु शकतो ज्या प्रश्नांची उत्त्तरे माहित आहेत, अशीच उत्तरे दिली तर निगेटिव्ह मार्किंगमुळे नुकसान होणार नाही असे श्री पोफळे यांनी सांगितले, या सोबतच यु.पी.एस. सी. परिक्षेतून कोणती पदे भरली जातात त्याचा अभ्यासक्रम कसा आणि त्याची तयारी कशी करावी या विषयी सविस्तर मार्गदर्शन श्री पोफळे यांनी केले.

**सत्र दुसरे**

दुसऱ्या सत्रास प्रमुख वक्ते म्हणून श्री ज्ञानेश्वर वराडे (संकल्प एज्यूकेशन अकॅडमी औरंगाबाद) हे लाभले होते त्यांनी बँकिंग परिक्षा तयारी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात हे लाभले होते. श्री ज्ञानेश्वर वराडे यांनी आपल्या मार्गदर्शनात बँकिंगच्या परिक्षा कोणत्याही शाखेचा पदविधर देऊ शकतो असे मत मांडले बॅकिंग परिक्षेसाठी मॅथेमॅटीक्स अकाऊंट, स्टॅटीस्टीक, टॅली, व कॉम्प्यूटर चे ज्ञान असणे गरजेचे आहे, असे सांगतले. बँकींगच्या परिक्षा कोण कोणत्या

पदासाठी असतात. त्यांचा अभ्यासक्रम आणि तयारी या विषयी सविस्तर मार्गदर्शन श्री ज्ञानेश्वर वराडे यांनी विद्यार्थ्यांना दिले.

**समारोप सत्र**

समारोप सत्रास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अनिल पाटिल (माजी संचालक, नगर नियोजन औरंगाबाद) हे लाभल होते त्यांनी एम. पी. एस. सी परिक्षा या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे लाभले होते.श्री अनिल पाटिल यांनी एम. पी. एस. सी परिक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केणकोणत्या पदावर जाता येते, त्याचा अभ्यासक्रम व तयारी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले एम. पी. एस.सी. परिक्षा ही मराठी माध्यमातून असल्यामुळे अभ्यासक्रम व संकल्पना विद्यार्थ्यांना चांगल्या पध्दतीने कळू शकतात एम. पी. एस. सी. परिक्षेसाठी विद्यार्थ्यांचे चौफेर वाचन असावे, गटचर्चा, स्वतःच्या नोट्स चालू घडामोडीची नोंदवही इ. माध्यमातून विद्यार्थी आपले ज्ञान वाढवू शकतात. पाटील यांनी आपल्या जीवनातील वेगवेगळया परिक्षेसंदर्भातील अनुभव सुध्दा विद्यार्थ्याना सांगितले. अध्यक्षिय समारोप डॉ. एस. आर. टकले यांनी असे मत व्यक्त केले की, आज वाढती बेरोजगारी लक्षात घेता नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत आहे, त्यामुळे स्पर्धा परिक्षा हे एकच माध्यम आहे. जिथे शासकिय नोकऱ्यांची संधी आहे. पण त्यासाठी विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता सिध्द करावी लागते.

सदरिल कार्यशाळेत प्रस्तुत महाविद्यालय व अन्य महाविद्यालयातील ८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

## महिला सबलीकरण कार्यशाळा (१९ नोव्हेंबर २०१६)

**उद्घाटन सत्र**

महिला सबलीकरण कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमास उद्घाटक म्हणून जिल्हा परिषद सदस्य श्रीमती अनुराधाताई चव्हाण, बीजभाषक म्हणून डॉ. स्मिता अवचार (समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.) आणि अध्यक्ष म्हणून डॉ. सर्जेराव ठोंबरे (सचिव, पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था (वरुड) औरंगाबाद) हे लाभले होते. उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी श्रीमती अनुराधाताई चव्हाण यांनी असे मत व्यक्त केलो की. महिला हया मुळातच सक्षम आहेत. पण त्यांना त्याची जाणिव नसते. महिला हया सामाजिक व आर्थिक व्यवहारात पुरुषा पेक्षा अधिक सरस असतात. महिलांना मानसिक रित्या सबळ बनविण्यासाठी अशा कार्यशाळांची खूप गरज आहे. डॉ. स्मिता अवचार यांनी आपल्या बीजभाषणात असे मत व्याक्त केले की, महिला याच महिलांचा द्वेष करतात व एकमेकांना त्रास देतात. समाजातील सर्व स्तरातील माहिलांनी एकत्र येऊन मैत्रिच नात गुंफल तर त्यांचे प्रश्न आपोआप सुटतील माहिलांचे प्रश्न व समस्या महिलांनीच सोडविल्या पाहिजेत. त्यासाठी एकमेकांना मदत केली पाहिजे महिलांच्या सर्व समस्यांचे मूळ महिलांच्या आर्थिक परावलंबनात आहे. म्हणून महिला बचत गट हे महिला सबलीकरणाचे प्रभावी आहे. अध्यक्षीय समारोपात डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी असे मत व्यक्त केले की, ग्रामीण भागातील महिला ही शहरी भागातील महिलेपेक्षा अधिक कार्यक्षम व समंजस असते महिला शिक्षित असो अथवा निरक्षर असो तिच्यात उपजतच शहाणपण असते. म्हणूनच ती कुंटुंब व नातेसंबंध व्यवस्था अधिक चांगल्या पध्दतीने जपू शकते. सदरिल कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी व्यक्त केले तर सुत्रसंचालन डॉ. राजश्री पवार व डॉ. महेश थोरात यांनी केले.

**सत्र पहिले**

उद्घाटन सत्रानंतर झालेल्या प्रथम सत्राचे प्रमुख वक्ते डॉ. मोगल बेग (अध्यक्ष सहयोग संस्था) हे होते त्यांनी आपल्या मार्गदर्शनांत महिला सबलीकरण आणि लघु उद्योग या विषयी सखोल माहिती दिली. डॉ. मोगल बेग यांनी असे मत मांडले की, महिला बचत गट हे महिलांच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम आहे. बऱ्याच महिला बचत गटात पैसे जमा करणे व गटातील गरजू महिलांना खर्चा साठी पैसे देणे इतपतच काम करणे हाच हेतू नाही तर, त्यामाध्यमातून एखादा रोजगार देणे अपेक्षित आहे. महिला गृह उद्योग हा देखील अशाच प्रकारचा उद्योग आहे. डॉ. मोगल बेग यांनी महिलांना कोणकोणता उद्योग करता येतो व त्याला बाजारपेठ कशी मिळविता येते या संबंधी देखील मार्गदर्शन केले.

**सत्र दुसरे**

सुसऱ्या सत्रास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. स्वाती शिरडकर (स्त्री रोग तज्ज्ञ एम. जी. एम. हॉस्पिटल औरंगाबाद ) हया लाभल्या होत्या त्यांनी महिला सबली करण आणि आरोग्य या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले

डॉ. स्वाती शिरडकर यांनी असे मत व्यक्त केले की, महिला हया कुंटुंबातील सर्व व्यक्तिंचे भरण पोषण करतात त्यांच्या आरोग्याची काळजी घेतात पण स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत नाहीत. महिलांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेला पोषण आहार घेत नाहीत याचे ग्रामीण महिलांत प्रमाण अधिक आहे. महिलांनी आपल्या अवयवांची स्वतः तपासणी करावी कुठल्याही अवयवात वेदना किंवा गाठ आढळल्यात तात्काळ दवखान्यात दाखवावे डॉ. स्वाती शिरडकर यांनी महिलांमध्ये आढळणाऱ्या सर्व सामान्य आजाराविषयीची सविस्तर माहिती दिली.

**समारोप**

समारोप सत्रास प्रमुख वक्त्य म्हणून डॉ. मधुश्री सावजी (प्रमुख विद्याभारती, देवगिरी प्रांत)हया लाभल्या होत्या त्यांनी महिला सबलीकरण आणि शिक्षण या विषयी महिलांना मार्गदर्शन केले. डॉ. मधुश्री सावजी यांनी आपल्या मार्गदर्शनांत असे मत व्यक्त केले की, महिलांना सबल मनविण्यासाठी त्यांना शिक्षण देणे खुप गरजेचे आहे. एका शिक्षीत महिले मुळेच पुर्ण कुंटुंबाची प्रगती होते. एक माता व पालक म्हणून महिलांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे कसे लक्ष द्यावे, मुलाना चांगल्या सवयी व चांगले संस्कार कसे द्यावे या विषयी माहिती दिली. अध्याक्षीय समारोपात डॉ. एस. आर. टकले यांनी असे मत व्यक्त केले की, महिलांना योग्य शिक्षण व संधी मिळाली तर त्या आधिक कार्यक्षमतेने काम करु शकतात. महिलांनी शारिरीक, मानसिक व आर्थिक दृष्टीने सबळ बनणे गरजेचे आहे.

सदरिल कार्यशाळेत फुलंब्री गावातील ८६ महिलांनी सहभाग घेतला होता.

## पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा (९ फेब्रुवारी २०१७)

दि. ९ फेब्रुवारी २०१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या विद्यार्थी कल्याण विभाग आणि महाविद्याल याच्या वतीने एकदिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी पर्यावरण विषयासंदर्भात भित्तिपत्रिकेची प्रदर्शनी लावण्यात आली. कार्यक्रम एक दिवसातील चार सत्रामध्ये घेण्यात आला.

१) **उद्घाटन सत्र :** डॉ. सतिष पाटील (BCUD, Director, BAMU) यांच्या मार्गदर्शन बीजभाषनाने कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव डॉ. सर्जेराव ठोंबरे उपस्थित होते.

२) **दुसरे सत्र :** डॉ. सचिन मोरे (प्राध्यापक, राजर्षी शाहु महाविद्यालय, पाथ्री) यांनी प्रमुख वक्ते म्हणून पर्यावरणासंबंधी विस्तृत विवेचन केले.

३) **तीसरे सत्र :** श्रीमती ज्योती बोघे (डी.ई.एस. विद्यालय, पुणे) यांनी 'पर्यावरण शाश्वता' या विषयावर आपले विचार मांडले.

४) **समारोप सत्र :** श्रीमती सुजाता नायडु (डी.ई.एस. विद्यालय, पुणे) यांनी पर्यावरण व आहरशस्त्र या विषयावर विचार मांडले

## यशंवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## अभ्यासकेंद्र श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

१) दि. ०१/०७/२०१६ पासून पूर्वतयारी व बी. ए. चे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने सुरू झाले. ऑनलाईन प्रवेश पद्धतीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२) विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांसाठी प्राप्त सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात आल्या.

३) अभ्यासकेंद्राचे २०१५-१६ वर्षाचे ऑडीट करुन घेतले.

४) मुक्त विद्यापीठाच्या मागील वर्षीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश सुरु झाल्याची सूचना सांगण्यासाठी संपर्क साधण्यात आला. तसेच प्रवेश अर्जाची एक प्रत स्वीकारण्यात आली.

५) मे २०१६ च्या परीक्षेच्या निकालात त्रुटी दूर करण्यासाठी सदरील विद्यार्थ्यांचा यशंवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे पाठपुरावा केला.

६) ०५ जानेवारी २०१७ रोजी विद्यार्थी उद्बोधन वर्ग आयोजित करण्यात आला. यावेळी अभ्यासकेंद्राचे प्रमख प्राचार्य डॉ. सुभाष टकले, अभ्यासकेंद्र संयोजक डॉ. रामकिशन लोमटे, मार्गदर्शक म्हणून समंत्रक डॉ. अश्विन रांजणीकर हे उपस्थित होते.

७) पुनर्रपरीक्षार्थीच्या जानेवारी २०१७ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट वितरित केले.

८) आतापर्यंत २७६ विद्यार्थ्यांना पुस्तके अभ्यासकेंद्रामध्ये वाटप करण्यात आली.

९) अभ्यासकेंद्रासाठी आवश्यक स्टेनश्नरी खरेदी करण्यात आली.

१०) मुक्त विद्यापीठाकडून पाठविण्यात आलेले शैक्षणिक अध्ययन साहित्य स्वीकारण्यात आले.

११) विद्यार्थ्यांच्या विषय निवडीबाबत त्रुटी, विद्यापीठाची श्रेयांकतरची फीस भरण्याबाबतच्या त्रुटी आणि अभ्यासकेंद्राची फीस व फॉर्म न भरलेले विद्यार्थी यांच्याशी वेळोवेळी संपर्क केला.

१२) विद्यार्थी प्रवेशातील त्रुटी दूर करण्यासाठी दि. ०४/०२/२०१७ रोजी अभ्यासकेंद्र संयोजक डॉ. रामकिशन लोमटे यांनी नाशिक येथे जाऊन पत्र सादर केले.

१३) विद्यार्थ्यांना गृहपाठाचे प्रश्न देण्यात आले. तसेच त्याच्याकडून गृहपाठ स्वीकारण्यात आले.

१४)प्रवेशित विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | शिक्षणक्रम | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | पूर्वतयारी | जून-ऑगस्ट २०१६ | १५ |
| २ | बी. ए. प्रथम | २०१६-२०१७ | १३२ |
| ४ | बी. ए. द्वितीय | २०१६-२०१७ | १०० |
| ५ | बी. ए. तृतीय | २०१६-२०१७ | १४६ |
| एकूण | | | **३९६** |

१५)उद्‌बोधन वर्ग : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना उद्‌बोधन करण्यासाठी दि. ०५/०२/२०१७ रोजी महाविद्यालयाचे समंत्रक प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व्यासपीठावर अध्यक्ष स्थानी होते. विद्यार्थ्यांना केंद्र संयोजक प्रा. रामकिशन लोमटे यांनी वर्षभराच्या नियोजनाचे वेळापत्रक समजावून सांगितले. तसेच बी. ए. शिक्षणक्रमाचे एकूण ३९ विद्यार्थी उपस्थित होते.

१६) समंत्रक : महाविद्यालयातील प्राध्यापक आपापल्या विषयाचे समंत्रक म्हणून कामकाज पूर्ण करत आहेत. याशिवाय काही विषयासाठी बाहेरील समंत्रक नियुक्त केले होते. समंत्रकांना वेळापत्रकाची प्रत देण्यात येते.

**********************************